
जगदिश खांदेवाले



# उद्यमी

कादंबरी

## जगदिश खांदेवाले

ई साहित्य प्रतिष्ठान

# उद्यमी (Novel)


## जगदिश खांदेवाले

१ १ ३ शिवशंकर
शिवतीर्थ नगर कोथरुड
पुणे ४११०३८

मो.नं ९१५८६६१६३८

Email id - jlkhandewale@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २ सप्टेंबर २०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पण पत्रिका

चि.ओजस आणि चि विराज यास




जगदिश खांदेवाले
११३ शिवशंकर
शिवतीर्थ नगर कोथरुड
पुणे ४११०३८

मो.नं ९१५८६६१६३८
**9158661638**

श्री जगदिश खांदेवाले यांना वाचनाची अफ़ाट आवड आहे. लहानपणापासूनच. पण लेखनाला सुरुवात करायला मात्र वेळ लागला. फ्रेडरिक फॉर्सिथ,लीआँ उरिस,आयरव्हिन वॅलेस अशा इंग्रजी लेखकांबरोबरच पु ल.देशपांडे, जयवंत दळवी अशा मराठी लेखकांचे वाचन त्यांनी व्यासंगाने केले.

नोकरीतील निवृत्तीनंतर रारंगढांग वाचून त्यांना लेखनाची प्रेरणा मिळाली. आयुष्यभर त्यांनी “साधी,सरळ पण खंबिर माणसे यशस्वी होतात” हा विश्वास बाळगला आणि त्यानुसार ते जगले. त्यांच्या लेखनातसुद्धा हाच विश्वास येतो आणि त्यामुळे त्यांची दमदार कादंबरी मरगळलेल्या मनाला आत्मविश्वास देते.

त्यांचे जरी हे पहिलेच पुस्तक असले तरी त्यांच्या लेखनात नवखेपणाचा लवलेश नाही हे वाचकांना जाणवेलच. आपण हे पुस्तक वाचून झाल्यावर आपल्या प्रतिक्रिया त्यांना कळवाव्यात.

( या कादंबरीतील सर्व पात्रे, स्थळे, प्रसंग व नावे काल्पनिक असून, याचा प्रत्यक्ष काही संबंध नाही. यदा कदाचित तसा काही संबंध आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. )

# नेमणूक

मी सतीश, प्रथम श्रेणीत मेकॅनिकल इंजीनियरिंगची पदवी उत्तीर्ण झाल्यावर माझ्यासमोर पुढे काय करायचे हा प्रश्न अजिबात नव्हता. वडिलांचे छत्र लहानपणीच हरवलेले, आई शिक्षिका आणि पैशाचे पाठबळ शून्य असलेला माणूस नोकरीशिवाय दुसरे काय करणार? फक्त नशिब एवढेच म्हणायचे की कँपस् ईंटरव्ह्यू मधे आगमऑटो सारख्या नामांकित कंपनीत निवड झाली होती. सहा महिने प्रोबेशननंतर सुरवात पन्नास हजार म्हणजे माझ्या सारख्याला लॉटरीच की. कामाचे ठिकाण बेंगलुरु होते एवढेच काय ते पण राहण्याची सोय कंपनी तर्फे होती हेही नसे थोडके. थोडे सेट झाल्यावर बेंगलुरुलाच स्थायीक होवू असे ठरले व अस्मादिक कामावर रुजू झाले.

कंपनी अवाढव्य होती. प्रशिक्षण उच्च दर्जाचे होते याविषयी वादच नव्हता. एकूण तीस जणांची तूकडी होती. या इंड्कशन ट्रेनिंगच्या अंतर्गत सर्व महत्वपूर्ण विभागात दोन आठवडे प्रत्यक्ष काम करायचे, तुमचे काम, त्याचे विभागप्रमुखाकडून मूल्यमापन यावरून फायनल पोस्टिंग ठरायची. काम, वर्तन असमाधानकारक वाटल्यास घरी पाठवायचे. ईतकी साधी सोपी कार्यपद्धति होती. आमच्या तुकडीत माझ्यासारखे एक दोघे सोडल्यास बाकी सगळे हाय-फाय होते तसेच त्यांच्या ओळखी पण खूप होत्या त्यामुळे जरी मी सर्व ठिकाणी उत्तम काम केले असले तरी सर्वांचे वाटप झाल्यावर राहिलेले डिपार्टमेंट आपल्याला मिळणार याविषयी मला पक्की खात्री होती.

हा हा म्हणता सहा महिने पार पडले. आज विभाग-वार यादी जाहिर होणार असे कळले सेंट्रल ट्रेनिंगहॉल मधे सगळे आल्याची खात्री केल्यावर जयराजने (आमचा समन्वयक ) विशेष औपचारिकतेत वेळ न घालवता सर्वांचे अभिनंदन केले आणि नावे वाचण्यास सुरवात केली. लेटर देतांनाच तो नाव आणि विभाग मोठ्याने वाचत होता. सर्व लेटर्स वाटल्यानंतर त्याने कोणी राहिले आहे काय किंवा कोणाला चुकीचे लेटर दिल्या गेले आहे काय अशी त्याने विचारणा केली. मी शांतपणे हात वर करून मला लेटर मिळाले नसल्याचे सांगितले.

काहीशा आश्चर्याने त्याने माझ्याकडे बघितले व ईतरांना जाण्यास सांगितले. परत त्याने त्याचा सर्व रेकॉर्ड नीट तपासला. मी तर तीस लेटर्स नक्की पाठवली होती असे काहीसे पुटपुटत मला दोन मिनीटे थांबायला सांगून फोन करायला म्हणून बाहेर गेला. तो कोणाशी व काय बोलत होता हे मला काही नीट कळले नाही. फक्त यस सर, नो सर व थँक्यू सर एवढेच ऐकू येत होते. दहा मिनटांनी तो घाम पुसतच आत आला. आल्या बरोबर त्याने मला काहीतरी क्लेरिकल स्लिप झाल्याचे सांगितले व ताबडतोब प्लँट हेड (पीएच)ला भेटण्यास सांगितले. माझ्या जवळ लेटर नसल्याचे मी त्याच्या निर्देशनास आणल्यावर त्याची काही गरज नाही, मी बोललो आहे असे बडबडत बाबा अंतर्धान पावला.

यात माझे काहीच नुकसान नसल्याने आणि दुसरा पर्याय पण नसल्याने मी प्लँट हेड (पीएच) ऑफिस गाठले. तेथे पोचल्या बरोबर त्यांच्या पीएने सरळ आत जायची खूण केली म्हणजे जयराजचे इथेच बोलणे झाले असावे हा विचार करतच मी आत गेलो. पीएच काही पेपर्स वर सह्या करीत होते. मला बघताच किंचित हसून त्यांनी डावीकडच्या एका खुर्चीकडे बोट केले. मी खुर्चीत जाऊन बसलो. त्यांचे काम पूर्ण होताच ते काही बोलणार तेवढ्यात दहा बारा जण आपसात बोलत रिकाम्या खुर्च्यात बसले व प्राडक्शनची मिटिंग सुरू झाली. मी बाहेर जाण्यासाठी उठणार तेवढ्यात पीएच नी हातानेच खूण करून मला बसण्यास सांगितले.

त्यांचा पहिला प्रश्न उत्पादन प्रमुखाला आदल्या दिवशीच्या कमी झालेल्या उत्पादनाविषयी होता. उत्पादन प्रमुखाने दोन मशीनच्या बिघाडाचे कारण सांगितले. मेन्टेनंसने, दुरुस्ती ताबडतोब झाली पण ऑईल मिळायला एक तास लागल्याचे स्पष्टीकरण दिले. स्टोअरच्या माणसाने ऑईल महाग असल्याने जसे लागेल तसेच आणण्याचे ठरले असल्याने तेवढा वेळ लागल्याचे सांगितले. हे सर्व पीएच शांतपणे ऐकत होते.

सर्वांचे ऐकल्यावर त्यांनी आपण रिक्लेमड ऑईल का वापरत नाही असा प्रश्न मेन्टेनंस प्रमुखाला विचारला. वापरायला हरकत नाही पण ते महिन्याला फक्त दहा बॅरल मिळते असे त्याने ठामपणे सांगितले. पीएच नी लगेच रिक्लेमड ऑईल सेंटरला फोन केला व इतका कमी ऑऊट्पुट का असे विचारल्यावर तिथल्या माणसाने फोनवरच लिक ऑईल कमी म्हणजे वीस बॅरल दर महिन्याला मिळते. त्यामुळे तेच रिक्लेम करुन दहा बॅरल वापरायला मिळतात अशी माहिती दिली. मोबाइल स्पीकर मोडवर असल्याने हे सर्वांना व्यवस्थित ऐकू येत होते.

मोबाइल ऑफ करुन पीएच नी प्रश्नार्थक मूद्रेनी मेन्टेनंस प्रमुखा कडे बघितले. त्यावर आमच्याकडून वेस्ट ऑईल दर आठवड्याला पाठविले जाते असे त्याने स्पष्ट केले. मग मात्र पीएच नी आवाज चढवून तीघांनाही जाणीव करुन दिली की या टोलवाटोलवी मुळ कंपनीचे काल वीस लाखाचे नुकसान झाले आहे तसेच परत जर असे झाले तर घरी आराम करा. आता निघा.

या भरतवाक्यानंतर सर्व मंडळी दोनशेच्या स्पीडनी गायब झाली. या जुगलबंदीशी आपला काय संबंध असेल का या विचारात मी असतांनाच पीएच चा फोन वाजला. हो हो आलो असे घाईने बोलत ते खूर्चीतून उठले तेवढ्यात पीए आत आला. याला बॅरल मैदान दाखव, काम समजून सांग, जमल्यास मी थोड्या वेळाने तिथे येतो असे म्हणून ते गेले.

मी पीए बरोबर बँरल मैदानाकडे निघालो. रस्त्यातच त्याने केबिन मधील जुगलबंदी व त्यामागील कारणे विस्ताराने सांगितली.

त्याचे असे झाले होते की ऑईलच्या किमती वेगाने वाढत असल्याने कंपनीने दोन कोटि रुपये खर्च करुन ऑईल रिक्लेमेशन यूनिट सुरू केले होते पण ते अजूनही पूर्णपणे उपयोगी ठरले नव्हते. त्यामुळे नवीन ऑईल वरचा खर्च कमी होण्याऐवजी युनिटचाच खर्च वाढत होता. जुगलबंदीचे हेही एक कारण होते.

हे सर्व पुराण सांगेस्तो मैदान आले होते. एका फुटबॉलच्या मैदानात जवळपास चारशे पाचशे बँरल अस्ताव्यस्त पडले होते. दहा बारा मजूर ते एका बाजूला ढकलत होते.

“ही तुमची माणसं, आणि रिक्लेमेशन फायद्यात आणणे हे तुमचे काम” पीए नी समारोप केला. “कोणतीही मदत लागल्यास मला किंवा पीएच ला डायरेक्ट सांगा” हे पण आश्वासन त्याने दिले. मी त्याच्याकडून फक्त त्याचा, पीएच चा व सकाळ च्या जुगलबंदी मधील तीनही हिरोंचे नंबर घेतले. आम्ही उभे होतो तेथूनच त्यांचे शॉप व पीएच ची केबिन दिसत होती. तेही त्याने दाखविले. तेवढ्यात पीएच च्या केबिन मधील लाईट लागला. अरे पीएच आले वाटते असे म्हणत आणि परत एकदा काहीही मदत लागल्यास सांग असे सांगूनतो घाईघाईने गेला.

मला एव्हाना गरगरायला लागले होते. जिथे हे रथीमहारथी काही करू शकत नव्हते तीथे मी एक कालचा मुलगा, दहा मजूर घेऊन काय दिवे लावणार होतो? या कामाला एका क्वालीफाईड ईंजिनियरची काय गरज आहे हे ही मला कळेना. मैदानाच्या कडेला एक मोठा दगड दिसत होता. मी सरळ त्यावर जाऊन बसलो.

मला तिथे बसलेला बघून सर्व मजूर दबकत दबकत माझ्या जवळ आले. ते आल्यावर मला एका नव्या प्रश्नाची जाणीव झाली. तो प्रश्न होता भाषेचा. गेले सहा

महिने मी ज्या वर्तुळात वावरत होतो तीथे मला हा प्रश्न कधीही जाणवला नव्हता कारण कामकाज ईंग्लिश मधे चालायचे. ईथे प्रथमच कानडीशी संपर्क आला जी मला अजिबात येत नव्हती. कसेबसे मी मोडक्यातोडक्या हिंदीत मी त्याच्याशी संवाद साधू लागलो.

मला साधारणपणे समजला तो सारांश असा की ते काँट्रक्टरकडे काम करणारे अर्ध कुशल कामगार होते. त्यांच्याकडे कोणीही लक्ष देत नव्हते. जेवण, पाणी व टॉयलेट सारख्या मूलभूत सोयीपण नव्हत्या. काम करतांना लागल्यास औषधोपचाराची पण सोय नव्हती.

एव्हाना मला गरगरायला लागले होते. कंपनीची माझ्याकडून काय अपेक्षा आहे हेच मला कळेेना. काहितरी कारण दाखवून मला डच्चू देण्याचा हा प्रकार दिसतो पण कामगारांची अवस्था बघून निदान यांच्यासाठी तरी आपण काहितरी करावे असेही वाटू लागले.

त्यांच्यातल्याच एका चुणचुणीत कामगाराला, सदा त्याचे नाव, खूण करुन मी बरोबर घेतले व सरळ स्टोअरकडे निघालो. स्टोअर प्रमुखाला भेटून माझा परिचय दिला, कामाचे स्वरूप सांगितले आणि काही स्टेशनरी, टिंक्चर आयोडीन, कापूस, पेंट, ब्रश, कामगारांसाठी हातमोजे तसेच सेफ्टी शूज देण्याची विनंती केली. त्यांनी सर्व सामान सदा बरोबर पाठवण्याचे कबूल केले. एव्हाना जेवायची वेळ झाली होती. मी त्यांच्या बरोबरच जेवायला गेलो. जेवण झाल्यावर मला पीए दिसला. मी त्यांना पण मैदानाच्या बाजूला कामगारांना जेवणासाठी एक तात्पूरती शेड, पाण्याची सोय आणि मोबाइल टॉयलेटची सोय होऊ शकेल काय हे विचारले. जरूर काहितरी करू असे म्हणून तो गडबडीने गेला पण. हा माणूस नेहमी घाईतच दिसायचा.

नंतर मी रिक्लेमड ऑईल सेंटर ला गेलो. येथील कामगारांकडूनच पूर्ण प्रोसेस समजून घेतली. रोज वीस बॅरल पीट ऑईल मिळाल्यास रोज दहा बॅरल रिक्लेमड ऑईल तयार होऊ शकेल अशी त्यांना खात्री वाटत होती. तेवढ्यात त्यांचे साहेब पण आले. त्यांनी पण त्याला दुजोरा दिला व गमतीने म्हणाले की आजपासूनच सुरवात करा. संध्याकाळी सहा पर्यंत तुम्हाला मुदत!

मी त्यांचा मोबाइल नंबर घेतला आणि परत मैदानाकडे गेलो. बघतो तर काय तीथे टिंक्चर आयोडीनचा घमघमाट सुटला होता आणि कामगार लहान मुलांसारखे चार चार वेळा हातमोजे घालून काढून बघत होते. पायात शूज पण होते. त्यांचा तो निरागस आनंद बघून मलाच माझी लाज वाटू लागली. असे वाटले की किती साध्या गोष्टीत हें आनंद मानतात नाहीतर आपण, जरा मनाविरुद्ध काम आल्याबरोबर लगेच सोडून जायचा विचार करतो. मग मी स्वतः शीच ठरविले की या महिन्यात हे सर्व मार्गी लावायचे. त्यानंतर पण हेच काम करावे लागले तर मात्र राजीनामा द्यायचा.

हे एकदा ठाम ठरल्यावर मला एकदम मोकळे वाटू लागले. मी परत सदाला बोलावले आणि विचारले की सहा वाजायच्या आत वीस बॅरल रिक्लेमेशनला पाठवणे शक्य आहे काय. एव्हाना साडेचार वाजले होते आणि त्यांची शिफ्ट पाचला संपत होती. त्याने थोडा विचार केला, अजून तिघांना बोलावले, काहितरी त्याच्याशी बोलला आणि मला सांगितले की तुम्हीं फक्त ट्रकची सोय करा. झाले, परत मी आमच्या संकट निवारक पीए महाराजांना साकडे घातले. ट्रक मिळेल पण ओव्हर टाइम मिळणार नाही, त्याला कामगारांची तयारी आहे काय याची त्यांनी खात्री करुन घ्यायला सांगितले. सदाला तसे विचारल्यावर तो चालेल म्हणाला. ठरल्याप्रमाणे पाच वाजता ट्रक आला. सदा व बाकीच्या तिघांनी भराभर वीस बॅरल चढवले आणि रिक्लेमेशनला नेऊन जेथे पाहिजे तेथे ऊभे पण करुन दिले. तसा मला रिक्लेमेशन कडून फोन पण आला. साडेसहाच्या दरम्यान सदा व त्याचे

साथीदार परत येतांना दिसले. मला बघताच तुम्हीं थांबायची काही गरज नव्हती असे सांगून ते निघून गेले.

नंतर हळूहळू सात आठ दिवसांत कामाची घडी बसली. बँरलवर आँईल चे नाव लिहीणे, रिक्लेमेशनला वीस बँरलची लेव्हल ठेवणे यात सदा आणि त्याचे साथीदार चांगलेच तयार झाले. एक तात्पूरती शेड उभारण्यात आली.

पोर्टेबल फिल्टर पण मिळाला आणि मैदानाच्या टोकाला मोबाइल टाँयलेट लावण्यात आला. या पायाभूत सोयीमुळे कामगारांची कार्यक्षमता काही वाढली की नाही हे देव जाणे पण आपल्याकडे कोणी लक्ष देत आहे ही भावनाच त्यांचा आनंद द्विगुणित करीत होती हे नक्की.

आता मला थोडी उसंत मिळू लागली होती. स्वतःहून मी मेन्टेनंसला जाऊन त्यांच्या दोन शटडाउन मधे भाग घेतला. त्यामुळे मला बरीच माहिती झाली. सर्वांच्या संघटित प्रयत्नांमुळे पिट आँईलचे रोजचे प्रमाण दहावरून हळूहळू तीनपर्यंत खाली आले व मैदानातील बँरल्स झपाट्याने कमी होऊ लागले. त्याप्रमाणात रिक्लेम्ड आँईल पण नियमित मिळू लागल्याने नवीन आँईल खरेदी करावे लागत नव्हते.

शेवटच्या आठवड्यात तर मैदानात फक्त सहा असे बँरल उरले होते की जे रिक्लेमड होऊ शकत नव्हते. ते पण पर्यावरण विभागाने विल्हेवाट लावण्यासाठी कंपनी बाहेर नेले. जसे बँरल कमी होत होते तसे कामगार पण कमी होत होते. आता तर कोणीच नव्हते म्हणून तात्पूरती बनवलेली शेड, फिल्टर काढण्यात आले होते. मोबाइल टाँयलेट पण दूसरीकडे नेण्यात आले होते.

बँरल संपले की आपली नोकरी संपली. परत असले काम करण्यापेक्षा दूसरी नोकरी बघितलेली बरी या विचारात मी असतांनाच पी ए चा फोन आला. उद्या साडेनऊच्या मिटिंगला हजर रहा असा पी एच चा निरोप त्यानी दिला.

बरेच झाले असा विचार करून मी राजीनामा खरडला. तो खिशात ठेवुनच मी मिटींगला गेलो. मिटींग वेळेवर सुरू झाली. प्राडक्टशनहेडनी प्रेझेंटेशन केले. उत्पादनाचे लक्ष्य मेंटेनेंस आणि स्टोअरच्यासहयोगाने आपण गाठू शकलो हे नमूद केले तसेच ऑईल रिक्लेमेशन पूर्ण गतीने काम करीत असल्याने नवीन ऑईल खरेदी करायची गरज पडली नाही हे आवर्जून सांगितले.

त्यांचे प्रेझेंटेशन पूर्ण होताच सगळयांनी टाळया वाजवल्या. पण पीएच नी हात वर करुन मधेच त्या थांबवल्या. त्यांनी प्राडक्टशन हेड, मेंटेनेंस व स्टोअर प्रमुखांना संबोधून विचारले की एक महिन्यापूर्वी याच वेळी तूम्ही इथे काय बोलला होता हे तूम्हाला आठवते काय. त्यांचे गोंधळलेले चेहरेबघून त्यांनी आठवण करुन दिली की तूम्ही तिघेही ऑईल वेळेवर न मिळाल्याने मशीन दुरुस्तीला कसा वेळ लागला त्यामुळे उत्पादन कसे कमी झाले आणि त्याला आपण कसे जबाबदार नाही हे सांगण्यातच मग्न होता. ते पुढे असेही म्हणाले की तूम्ही हा प्रश्न सहज सोडवू शकला असता पण तुमचे ईगो आड येत होते. त्यामुळे मी एका नवीन ईंजिनियर वर हे काम सोपवले. मला पूर्ण कल्पना आहे की हे काम करतांना तो खूप निराश झाला असेल, ही कंपनी सोडण्याचाही विचार त्याच्या मनात आला असेल तरीपण त्याने नेटाने काम करुन एक सिस्टम लागू केली आणि त्यामुळेचहे रिझल्टस् मिळाले आणि तूम्ही आज हे प्रेझेंटेशन करू शकलात.

एवढे बोलून त्यांनी मला जवळ बोलावले, माझ्याशी हात मिळवला आणि लेटर माझ्या हातात देऊन ते सर्वांना म्हणाले मीट माय टेक्निकल अँडव्हायजर, मि. सतीश.

-------------------------

# ताबडतोब

आता मला पर्मनंट होऊन महिना झाला होता. आई सेवा निवृत्त झाल्याने ती माझ्याकडेच रहायला आली त्यामुळे माझी जेवणाची समस्या मिटली. आई मात्र फार लवकर समरस झाली. रोजच्या बाजारहाटाने ती थोडेफार कानडी पण बोलायला शिकली. सदाला कुठून कसे काय माझी आई आल्याची खबर लागली आणिकिरकोळ कामात तो स्वतः हुन आईला मदत करू लागला. काही दिवसांनी सौ. सदा घरचे कामकाज करतांना दिसू लागल्यावर मला घरची काळजी उरली नाही.

कंपनीत पण ठीक चालले होते. पीएच ची कामाची पद्धत, निर्णय क्षमता चकित करणारी होती. वर्कोहोलिक माणसाबरोबर काम करण्याचा एक वस्तुपाठच मला निःशुल्क मिळत होता यात शंकाच नव्हती. तशी फारशी कौटुम्बिक जबाबदारी नसल्याने मी पण झोकून देऊन काम करीत होतो.

त्यातच एका आठवड्यात आईने कणकण असल्याचे सांगीतले. काँलनीतल्या डॉक्टर नी तपासून औषध दिले पण ताप काही कमी होत नव्हता. तशी सदाची बायको काळजी घेत होती पण तीला लहान मूल असल्याने मर्यादा पडत होत्या. डॉक्टरांनी कालच सांगीतले की शहरात चिकणगुणीयाची साथ असल्याने त्याची टेस्ट सिटी हाँस्पिटल मधुन करून घ्या. टेस्ट करीता ते एकमेव केंद्र असल्याने गर्दी टाळण्यासाठी सकाळी अकराच्या आत तेथे जा हे सांगण्यास ते विसरले नाही. त्याप्रमाणे मी हाफ डे घ्यायचे ठरविले व कंपनीत साडेसहा वाजता आलो. सकाळचा लाईनअप आटपल्यावर मी यासंदर्भात सुधीर (पी ए) शी बोलत असतांनाच (जो आता चांगला मित्र झाला होता) पी एच बरोबर प्रोक्योरमेंट हेड आणि स्टोअर हेड मोठमोठ्याने बोलत येतांना दिसले.

पीएच् ना एवढे संतापलेले मी प्रथमच बघत होतो. ''आजच्या पुरतेच व्हिल ड्रम असल्याचे तुम्ही दोघेही मला आत्ता सांगत आहात. आधी सांगायला काय झाले होते?'' त्यांनी ओरडून विचारले. ''सर, पार्टी एकदम विश्वसनीय आहे. आता पर्यंत कधीही फेल गेली नाही. परवापर्यंत पाठवतो पाठवतो म्हणत होते पण कालपासून फोनपण उचलत नाही. ''प्रोक्योरमेंट हेडनी सफाई देण्याचा प्रयत्न केला.

त्यांचे वाक्य पूर्ण व्हायच्या आत पी एच नी मोबाइल. वरून नंबर डायल पण केला होता. पलीकडून फोन उचलताच त्यांनी गुड मॉर्निंग वगैरे न म्हणता काय रामजी सेठ ड्रम केव्हा पाठविणार, आमची लाईन बंद पडल्या वर काय अशी जराशी रागातच विचारणा केली. बहुतेक कोणीतरी स्त्री फोनवर असावी कारण त्यांचा आवाज लगेच खाली आला उलट ते सौम्यपणे होय का, असे काय, तीन दिवस झाले काय, बर बर, टेक केअर अशी वाक्ये बोलतांना ऐकू आले.

फोन वरचे बोलणे संपताच ते रागानेच परत प्राक्यूरमेंटहेडला म्हणाले तीन दिवसात तुम्ही कोणाला पार्टीकडे का पाठवले नाही, रामजी ICU त असून त्यांचा मुलाला तितकेसे काम जमत नाही असे त्याची आई सांगत होती. तेवढ्यात त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले. त्याच टोनिंग मधे मला ताबडतोब पार्टीकडे जाऊन उद्या सकाळच्या आत हजार ड्रम आणायचे सांगीतले आणि केबिनमधे गेले. आत गेल्यावर त्यांनी केबिनचे दार इतक्या जोरात आदळले की केबिनच्या काचा पण थरथरल्या.

मी पीए कडे अपेक्षेने बघितले तर तो सीलिंग बघत होता. तेवढ्यात प्रोक्योरमेंट हेड (मि. रामन) माझ्या जवळ आले व हळुवारपणे मला सॉरी म्हणाले. कशाबद्दल असे मी विचारले तर म्हणाले की हा सर्व प्रकार त्यांच्यामुळे झाला असे त्यांना वाटते म्हणून. मनात म्हणालो नको तीथे नको त्या वेळी मी हजर असावे

आणि गाळात जावे हा माझा कुंडली दोष तुम्हाला कसा माहिती असणार. पण वरकरणी हसत त्यांना It is okay, मला तुमची मदत पाहिजे असे म्हणालो.

काय पाहिजे ते सांग असे त्यांचे अपेक्षित उत्तर येताच मी त्यांना पार्टीकडे जाण्यासाठी गाडी आणि जे या पार्टीचे काम बघतात ती दोन माणसे पाहिजेत असे सांगीतले. जरूर असे म्हणून त्यांनी त्यांच्या माणसांना फोनवरच गाडी घेऊन ताबडतोब येण्यास फर्मावले.

गाडी व मटेरियल ऑफिसर्स (राज आणि जय) येताच राघव परत एकदा सॉरी म्हणाले. मला त्यांनी पार्टीला व्हिजीट तर दे, तोवर मी कंपनीतच काही करता येईल काय ते बघतो, तोवर पीएच पण शांत होतील असा दिलासा दिला.

ठीक आहे असे म्हणत आम्ही तिघेही निघालो. पार्टी नव्वद किलोमीटर अंतरावर वरद नावाच्या औद्योगिक वसाहतीत होती. पार्टीचा रेकार्ड चांगला आहे पण रामजी सेठच्या आजारपणाने जरा गोंधळ उडालेला दिसतो असे राजचे मत होते. जाऊन तर बघू यावर आमचे एकमत झाले. साधारण दिड तासात आम्ही अवधूत आटो वरद येथे पोचलो. वर्कशॉप मधे पाय ठेवल्या बरोबर मालक नसल्याचे पटकन लक्षात आले कारण दोन कामगार पेपर वाचत होते, दोघे बाहेर झाडांना पाणी घालण्यात मग्न होते. सहाजण गप्पा छाटित बसले होत फक्त दोघे लेथ वर काम करत होते. वर्कशॉप मधे चार लेथस्, दोन मिलिंग व दोन ड्रिलिंग मशीन होती. एक बेल्ट ग्राईंडर पण दिसला. भिंती लगत व्हिल ड्रमची कास्टिंगरचलेली होती.

आम्हाला बघताच एक सिनीयर कामगार पुढे आला व राजशी बोलू लागला.

मलाही समजावे म्हणून राज हिंदीत बोलत होता.

‘‘जयेश कोठे आहे’’. राजने विचारले.

“ हाँस्पिटलला गेले आहेत. मोठे सेठ icu त आहे तूम्हाला तर कल्पना असेलच”. तो उत्तरला.

‘‘हो, पण ईकडे केव्हा येतात?’’राजची विचारणा.

‘‘नक्की अशी वेळ नाही, पण येतील एवढ्यात’’ तो उत्तरला.

त्यांचे बोलणे ऐकत असतांनाच ड्रमच्या एका छोट्या ढिगाकडे माझे लक्ष गेले.

‘‘हे काय’’ मी विचारले.

‘तुमचेच ड्रम आहेत पण एक दोन आँपरेशन राहिले आहे आणि चुकून मिक्स झाले’

‘‘जरा वेगळे करून नक्की किती आहेत सांगता काय?’’.

ज़रूर असे म्हणत तो कामाला लागताच मी राजला जयेशशी संपर्क साधण्यास सांगीतले. जयेशने फोन उचलताच मी माझी ओळख सांगून प्रथम रामजी कसे आहेत हे विचारले. आता ठिक आहेत दुपारी icu तून बाहेर येतील असे त्याने सांगीतले. मी त्याला एका तासाकरता येण्याची विनंती केली. तो पण यायलाच निघाला होता.

ज्याला ड्रम साँर्ट करायला सांगीतले होते त्या कामगाराने एक किंवा दोन आँपरेशनस् राहिलेले एकंदर दोनशे ड्रम असल्याचेसांगीतले त्याचवेळी जयेश आला. त्याने पटकन उद्या दोनशे ड्रम नक्की पाठवितो अशी खात्री देताच मी त्याला हजार

ड्रम घेऊनच मी येथून जाणार असे शांतपणे सांगीतले. ते ऐकल्यावर राज पण दचकला.

“हे कसे शक्य आहे?”. राज ने चाचरत विचारले. जयेश पण साशंक दिसला.

“आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केल्यास सहज शक्य आहे”. मी उत्तरलो.

घरचा प्रॉब्लेम माझ्या डोक्यातून केव्हाच हद्दपार झाला होता. मी जयेश ला ड्राईंग आणि प्रोसेस शीट आणायला सांगीतले व जय ला एक कास्टिंग. कास्टिंग ला फारसे मटेरियल काढायला नव्हते. प्रोसेस शीट प्रमाणे चार मिनिटात एक ड्रम अपेक्षित होता.

सहज घड्याळ बघितले तर बारा वाजले होते. मी सर्वांना जेवण करून येण्यास सांगीतले. मला चतुर्थी असल्याने उपवास होता. जयेश फक्त माझ्याबरोबर थांबला. नंतर मी परत एकदा प्रोसेस शीट बघितली. दोन वेळा फेसिंग व नंतर मिलिंग हा क्रम मला खटकला. मिलिंग असतांना एक फेसिंग टाळता येणे शक्य होते. त्यामुळे तासाला पांच ड्रम जास्त होऊ शकत होते. जय आणि राज तेवढ्यात जेवण करुन आले. मी त्यांना व जयेशला याबाबत विचारल्यावर हे आधीपासून असेच चालू आहे असे उत्तर मिळाले. मी कंपनी त रामन ला फोन लावला आणि माझी शंका विचारली. त्यांनी लेटेस्ट ड्राईंग व प्रोसेस शीट ताबडतोबजयेश ला मेल केली. त्यामधे एका साईडलाच फेसिंग होते.

“म्हणजे आम्ही उगीच एक ऑपरेशन जास्त. करत होतो” जयेशने विचारले.

“होय, आता सर्वांना बोलाऊन ओव्हरटाईम करावा लागेल हे सांग, तसेच मी सांगेल तसे काम करावे लागेल हे पण स्पष्ट सांग. मग तू थांबला नाही तरी चालेल”.

जरूर असे म्हणत तो कामगारांशी बोलायला गेला.

''आम्ही पण तयार आहोत''. राज आणि जय न विचारता म्हणाल्यावर मला बरे वाटले.

मी त्यांना सर्व प्रथम एव्हाना रिवर्क झालेले दोनशे ड्रम चेक करण्यास सांगीतले. नंतर मी सर्व कामगारांना लेटेस्ट प्रोसेस शीट समजावून सांगीतली व टर्निंग होताच मिलिंग किंवा ड्रिलिंग जे रिकामे असेल तीथे ड्रम ठेवण्यास सांगीतले. राज आणि जयला मी सर्व ऑंप्रेशन झाले की नाही यावर लक्ष ठेवणे व राहिलेले ऑंप्रेशन पूर्ण करून घेणे एवढेच काम सोपवले. बघता बघता कामाने गती पकडली आणि दहा वाजेपर्यंत सातशे ड्रमस् तयार झाले.

जयेश मधे दोन वेळा येऊन गेला. दहा वाजता परत आल्यावर त्याने रामजींना ICU तून बाहेर आणल्याचे आणि आता तब्येत स्थिर असल्याचे सांगीतले. त्याचे टेन्शन बरेच कमी झालेले दिसत होते. फक्त शंभर ड्रम करायचे बाकी आहेत असे माहिती झाल्यावर त्याने आग्रह करुन मला, जय व राज ला जेवायला नेले. त्याआधी हे शंभर ड्रम आम्ही यायच्या आत पूर्ण करा आणि नंतरच घरी जा असे बजावयाला तो विसरला नाही. राज आणि जय ला मी जे पाहिजे ते खायला प्यायला मुभा दिली फक्त लिमिट मधे ही पुस्तीपण जोडली. दिवसभर दोघांनी फारच कष्ट उपसले होते त्यामानाने एवढी सूट क्षुल्लक होती. जयेशने पणजेवण केले. उपवास असल्याने मी लस्सीवर भागवले. जयेश जेवत असतांनाच मी त्याला सकाळी चार वाजता ट्रकची व्यवस्था करण्यास सांगीतले तसेच तोपर्यंत आम्ही शॉंप मधेच आराम केल्यास चालेल काय हे विचारले. त्याची अर्थातच काही हरकत नव्हती. जेवण झाल्यावर आम्ही जेव्हा परतलो तेंव्हा कामगारांनी हजार फिनिश्ड ड्रम एका जागी व्यवस्थित लावून ठेवले होते. सर्व आवरासावर करुन ते गेले होते. फक्त केबिनचा लाईट सुरू होता. मी जय आणि राजला केबिन मधे असलेल्या दोन सोफ्यांवर ताणुन द्यायला सांगीतले. चार वाजता ड्राइव्हर आणि ट्रक कोणत्याही

परिस्थितीत येथे आलेच पाहिजेत असे मी जयेशला परत एकदा बजावले आणि घरी जाऊन आराम करायला सांगीतले.

आता टेंशन नसल्याने घरी काय झाले असेल हा विचार माझ्या मनात डोकावू लागला. केबिनमधे जाताच मी मोबाइल ऑन केला. जवळपास तीस मिस् कॉल आलेले दिसत होते. पीएच चे पण दोन कॉल होते बाकी सर्व सुधीर, रामन आणि ऑफिसचे होते. जय आणि राज यांच्यावर संपर्काचे काम पूर्णपणे सोपवल्याने मी मोबाईल बघितला पण नव्हता आणि आता कोणालाही फोन करण्यात अर्थ नव्हता. त्या सर्व मिस कॉल मधे एक नवीन नंबर आठ वेळा रिपीट झालेला दिसत होता. तो कोणाचा असावा असा विचार करतच मी टेबलावर डोके टेकले आणि झोपी गेलो.

सकाळी बरोबर चार वाजता वॉचमनने मला आवाज देऊन उठवले व ट्रक आल्याची वर्दी दिली. तेवढ्यात गरम चहा घेऊन जयेश आला. राज आणि जय तोवर उठले होते. सर्वांनी फ्रेश होऊन चहा घेतला. जयेश पेपर्स तयार करेपर्यंत ट्रक लोडिंग पूर्ण झाले होते. निघण्यापूर्वी मी जयेशला सगळी प्रोसेस समजली की नाही याची खात्री करून घेतली. ठीक साडेपांच वाजता आम्ही तेथून निघालो आणि फारशी रहदारी नसल्याने एका तासात कंपनीत पोचलो.

कंपनीत पोचताच सर्व सूत्रे राजने हाती घेतली. लाईन आणि स्टोअर

वर ड्रम उतरवून घेणे, संबंधित लोकांना कळवणे या गोष्टी त्याने सराईतपणेहाताळल्या. मला आता घरचे वेध लागले होते. मी त्यांचे आभार मानले आणि घरी निघालो.

-----

# धक्का

घरी पोचताच मी डोअर बेल वाजवताच एका कॉलेज तरूणीने दार उघडले. विचाराच्या भरात बहुतेक आपले घर चुकले असे समजून मी तीला सॉरी मला वाटले की माझेच घर आहे असे म्हणालो. त्यावर सतीश हे तुझेच घर आहे असे म्हणाली. मला गोंधळलेला बघून ती हसली आणि आत येण्यास सांगून, प्रथम फ्रेश व्हा नंतर सर्व समजावून सांगते असे म्हणाली. काय गौड बंगाल आहे हे मला कळेना. मला आता थकवा जाणवायला सुरवात झाली होती. विषेश न बोलता मी सरळ बाथरूम चा रस्ता पकडला. जातांना सहज आईच्या रुम मधे डोकावलो तर त्यांना आता शांत झोपू दे, तुझे आधी आटप असे ती मागून म्हणालीच. ही कोण हे माझ्या काही केल्या लक्षात येईना. पण बोलण्याचीलकब मात्र परिचित वाटत होती. आई उठल्यावर कळेलच असा विचार करून मी माझे सर्व आटपून बाहेर आलो.

तोवर आई उठली होती व हॉलमधे येऊन बसली होती. मी येताच ती काही बोलायच्या आत मी आईला सांगीतले की काल आमच्या हिटलरनी मला अचानक बाहेर पाठवल्याने मला घरीपण येता आले नाही तरी आज आपण टेस्ट उरकून घेऊ. तसेच ही पाहूणी कोण हे विचारले.

“मी सीमा, तुमच्या हिटलरची मुलगी”. ती चहा आणताना म्हणाली.

मी मनाशीच म्हणालो की तरीच बोलायची पद्धत परीचित वाटते. मी अधिक काही बोलायच्या आत आई सांगू लागली की काल मी वरदला गेल्यावर थोड्यावेळाने सुधीरने माझा प्रॉब्लेम पीएच ला विशद केला होता. ऐकल्यावर त्यांनी दोन वेळा मला फोन करण्याचा प्रयत्न केला पण मी फोन उचलला नाही. सुधीरने सुद्धा बराच प्रयास केला. शेवटी दोघेही ईथे आले. मला सर्व परिस्थिति

सांगून सिटी हॉस्पिटल ला नेले व तीथे सीमा च्याहवाली केले. ती सिटी हॉस्पिटलमधे रेसिडेंट डॉक्टर म्हणून काम करते. तीनेच सर्व टेस्ट करून घेतल्या, औषधे बदलून आठ तास आयसोलेशन मधे ठेवले. एवढेच नव्हे तर तीच्या बाबांची परवानगी काढून रात्री माझ्या सोबतीला थांबली.

"शिवाय वेळ काढून तुला आठ कॉल केले. तू एकही उचलला नाही तो भाग वेगळा". सीमा ने पुस्ती जोडली.

अच्छा, तो नवीन नंबर हीचा आहे तर मी मनाशीच म्हणालो वरकरणी मात्र सॉरी सीमा, मला तूझी माफी कशी मागावी हेच कळत नाही असे म्हणालो.

कळत नाही तर मागू नकोस असा तीचा पलट वार आलाच. तेवढ्यात पीएच चा ड्राइवर, राजाराम आला व सांगू लागला की साहेबांनी बोलावले आहे.

मला त्यांना भेटून सॉरी म्हणायला हवे असे म्हणत मी जायला निघताच सीमा पण माझ्याबरोबर निघाली. सतीश एका तासात परत येईल तोवर तुम्ही आराम करा आणि जेवायला काही करू नका, मी दुपारी सर्वांसाठी डबा आणेल असे म्हणत, आईला काही बोलण्याची संधि न देता ती गाडीत बसली सुद्धा.

राजारामाला असल्या फटाक्यांची सवय असावी कारण काही न बोलता त्याने दहा मिनिटात पीएच च्या ऑफिस समोर गाडी थांबवली. सीमा गाडीत बसून राहिली पण जर पंधरा मिनिटाच्या आत तू परत आला नाही तर मी ऑफिस मधे येईल अशी सूचना वजा धमकी तीने दिली. मग काय वाघाच्या गुहेत मी एकटाच शिरलो.

नशिबानी पीएच एकटेच होते. मला बघताच ते म्हणाले "छान काम केले सतीश. आताच जयेशचा फोन आला होता. तू काल त्याचे शॉप काल हायजँक केले

म्हणे. एनी वे तूझ्या प्रॉब्लेमबद्दल मला जरा उशीरा माहिती मिळाली. मी त्यामुळे मी माझ्या मुलीची बोलणी खाल्ली. ती तुलापण कदाचित काही बोलेल”.

“सर, माझा कोटा सकाळीच पूर्ण झाला आहे”.

“म्हणजे ती तुला भेटली?”.

“आता खाली गाडीत बसली आहे “

“मग काय बोलणेच संपले. आता घरी जा, आराम कर आणि उद्याच कामावर ये”.

ठीक आहे असे म्हणत मी जायला निघालो तोच ते नजर चुकवत म्हणाले”अरे काही प्रॉब्लेम असल्यास जरा बोलत जा, शेवटी अंतिम जबाबदारी माझीच असते”.

सीमाने मला घरी सोडले व दोघेही आता आराम करा, मी दुपारी डबा घेऊन येईल असे पुन्हा एकदा बजावून गेली.

आईला बरे वाटे पर्यंत आणि नंतर पण ती येऊ लागली. सीमाने स्वत:हुन पुढाकार घेऊन आईला बेंगलुरु दाखविले. काही ठिकाणी मी पण सोबत होतो. सीमाची आई लहानपणीच गेली होती त्यामुळे असेल कदाचित पण तीचे आईशी चांगलेच पटायचे. तीने तिच्या मित्रमंडळीशी पण ओळख करून दिली. सगळे मनमोकळे आणि सुसंस्कृत होते.

एकंदरीत दिवस मजेत जात होते.

---------

# प्रिसिजन डायमेंशन

आपले शिक्षण व्यवहारात किंवा नोकरीत किती टक्के वापरावे लागते याविषयी माझे नेहमीच मित्रांशी वाद व्हायचे. कंपनी च्या प्रशिक्षणा बाबत मात्र मला शंका नव्हती. फक्त आपण झापड लावून काम करतो त्यामुळे प्रशिक्षणाचा उपयोग करीत नाही असे मला वाटत होते. लवकरच त्याचा उपयोग करावा लागेल याची मात्र मला कल्पना नव्हती.

एक दिवस सकाळी रिपोर्टस् बघत असतांना फँब्रिकेशन विभागातून फोन आला.

“ताबडतोब या, दुपारी साडेचारला एक्सपोर्ट ला पाठवायचे वीस ट्रेलर रिजेक्ट झाले आहेत “ पलिकडून सांगण्यात आले.

मला प्रसंगाचे गांभीर्य लक्षात आले.

कंपनी दर महिन्याला वीस ट्रेलर स्पेन ला निर्यात करायची. निर्यातीचा माल असल्याने गुणवत्तेवर फार जोर होता. मी फँब्रिकेशन विभागात गेलो. मला बघताच क्वालिटी चा माणूस रिपोर्ट घेऊन आला. त्याच्याबरोबर मी ट्रेलर बघण्यास गेलो.

‘तळाला जे नव्वद मिलिमीटर चे होल आहे ते शंभर मिलिमीटर चे झाले आहे’

‘काही करेक्शन करता येईल?’

‘सतीश, हा एक्सपोर्ट आयटेम आहे म्हणून तो विचार पण करू नको’

तेवढ्यात विभाग प्रमुख कुट्टी आले. नेहमी हसतमुख असणारे कुट्टी सर आज जरा गंभीर दिसत होते.

‘अरे सतीश बरे झाले तू आलास. चल मी तुझ्या बरोबर येतो. मला ही बाब पीएच ला स्वत: भेटून सांगीतली पाहिजे’.

हा सालस माणूस आज तोफेच्या तोंडी जाणार या विचारानी मला वाईट वाटले.

‘सर, हे होल कशाकरता आहे’

‘कस्टमर्स डिमांड, सुरवातीला नव्हते. नंतर त्यांनी सांगीतले. डिजाइनरला माहिती असेल कदाचित. ’

‘सर, मला एक शेवटचा प्रयत्न करू द्या’

‘तू काय करणार आहेस? ट्रेलरला तर हात पण लावता येणार नाही’.

‘जर मी तीन वाजे पर्यंत काहीच करू शकलो नाही तरच तूम्ही तीनच्या डिस्पँच मिटिंग मधे या कारणाने डिस्पँच होऊ शकत नाही असे सांगा’.

‘इतका वेळ का गप्प बसला असे कोणी विचारलेतर?’.

‘माझे नाव सांगा. मी होल्ड करायला सांगीतले असे सांगा’

‘तू का हे अंगावर ओढून घेत आहेस?’

‘सर प्लिज, आता दहा वाजले आहेत. मला काही शंका आहेत, त्या निरसन करण्यासाठी फक्त तीन वाजेपर्यंत वेळ द्या’.

कुट्टी थोडा वेळ शांतपणे माझ्याकडे बघत राहीले. मग हळुच म्हणाले, ’ठीक आहे. सध्या माझी परिस्थिति वाईट आहे. तीन वाजेपर्यंत तू काहीच करू शकला नाही तर ती अतीशय वाईट होईल. अजून काय होणार आहे?’.

‘थँक्यू सर. मला प्रयत्न तर करू द्या’

मी त्यांच्या समोरच डिजाइनरला फोन लावला आणि या होल बद्दल विचारले. कस्टमरने सांगीतले म्हणून टाकले. ते कशाकरता आहे याची कल्पना नाही असे ते म्हणाले. कस्टमरनेच सुरवातीला पन्नास मिलिमीटर साईज सांगीतली होती पण नंतर वाढवून नव्वद सेटल केली ही माहिती पण त्यांनी पुरविली. कस्टमर सांगतो म्हटल्यावर त्याच्या दृष्टिने काहितरी महत्वाचे असणार पण ते काय असेल हे कोणालाही माहिती नव्हते किंवा कोणालाही माहिती करून घ्यायची गरज वाटली नव्हती. माझी पाटी कोरी होती म्हणून मी बेधडक सर्वांना विचारत सुटलो. साधारण अकरा वाजेपर्यंत माझे सर्व संबंधितांना विचारून झाले पण प्रगति मात्र शून्य.

कुट्टी अधूनमधून चक्कर मारत होते. ते वरून दाखवीत नसले तरी बरेच अस्वस्थ होते हे नक्की. मी मोबाइल खाली ठेवताच त्यांनी मला बळे बळेच चहा प्यायला नेले. जातांना त्यांना घरून फोन आला. फोनवर बोलता बोलता ते अचानक म्हणाले की मला काय पाहिजे हे मला माहिती असणार की तूला. हे वाक्य ऐकताच माझी ट्यूब पेटली. गेला एक तास आपण ईतरांना विचारण्यात वेळ वाया घालवला त्याऐवजी कस्टमरलाच विचारले असते तर एव्हाना उत्तर मिळाले असते हे मला जाणवले. चहा पीत असतांनाच मी आमच्या एक्सपोर्ट सेलला फोन लावला व स्पेन मधील एजंटचे नाव व नंबर घेतला. तसेच स्पेनच्या व भारताच्या वेळेत

कितीचा फरक असतो हे विचारले. भारतातील वेळस्पेनच्या पुढे साडेतीन तास असते हे कळल्यावर मी नकळत शिट्टी वाजवली. म्हणजे आता स्पेनमधे सकाळचे आठ वाजले असतील मी स्वतःशीच पुटपुटलो.

संभाषणाचा रोख पूर्ण पणे बदलल्याचे बघून आता कुट्टींना पण रस वाटू लागला. बाँड, आता काय विचार आहे असे त्यांनी विचारले. आता कस्टमर लाच डायरेक्ट विचारू असे मी सांगताच ते. म्हणाले जरूर, निदान खरे काय आहे हे तरी कळेल.

त्यामुळे उत्साहित होऊन मी सुधीर (पीए) कडे गेलो. तेथून प्रथम एजंट ला फोन लावला. परेरा नावाच्या माणसाने फोन उचलला. माझी शंका ऐकल्यावर त्याने एक सविस्तर मेल आणि ड्राइंग ताबडतोब पाठवायला सांगीतले. मेल मिळाल्यावर एका तासात उत्तर मिळेल ही पण त्याने ग्वाही दिली. त्याप्रमाणे मी माझ्या नावाने पण सुधीरच्या मेल बाँक्स वरूनच केले. त्याला सर्व माहिती मिळाल्याचे फोन करुन खात्री करून घेतली.

हे सर्व केल्यावर मी कुट्टींना म्हणालो की हा शेवटचा प्रयत्न. आता दोन वाजेपर्यंत वाट बघणे एवढेच आपल्या हातात आहे. ते पण माझी धडपड बघतच होते. ओके, कीप मी पोस्टेड एवढेच म्हणत ते त्यांच्या कामाला गेले. सुधीरला मेल वर लक्ष ठेवण्यास सांगून मी पण शाँप मधे गेलो.

जेवण झाल्यावर मी परत कुट्टी सरांकडे गेलो. त्यांनी प्रश्नार्थक मुद्रेने बघितले. अजून तरी काही उत्तर नाही हे मी सांगताच ठिक आहे, तू खूप प्रयत्न केले आता माझी जबाबदारी असे तो भला माणूस म्हणाला.

तीन वाजता च्या मीटिंग ला आम्ही बरोबरच गेलो. आत जाण्यापूर्वी मी सुधीरला परत एकदा मेल चेक करायला सांगीतली. त्याने चेक करून अजून काही उत्तर आले नाही हे सांगीतले. काहीश्या निराशेने आम्ही दोघेही आत गेलो. क्वॉलिटी

हेड च्या बाजूला आम्ही दोघेही जाऊन बसलो. त्यांनी रिजेक्शन रिपोर्ट दिल्यावर कुट्टी सरांनी बोलायचे ठरवले.

पीएच क्रमानुसार प्रत्येकाला डिस्पँच झाला काय, झाला नसल्यास त्याचे कारण आणि केलेली उपाय योजना विचारत होते. प्रत्येक उत्तरागणिक त्यांचा पारा चढत होता. क्वॉलिटी हेडला ते विचारणार तेवढ्यात सुधीर वेगाने आत आला. त्याच्या हातात चार पेपर्स होते. त्याने ते पटापट पीएच, क्वॉलिटी हेड, कुट्टी सर आणि माझ्यासमोरठेवले. क्षणार्धात तो बाहेर गेला.

पीएच नी शांतपणे पेपर वाचला. ते किंचित हसल्यासारखे मला वाटले. कदाचित मला भास झाला असेल. आम्ही पण पत्र वाचतच होतो. सर्वांचे वाचून झाल्यावर त्यांनी विचारले ‘ट्रेलर एक्सपोर्ट डिस्पँच, एनी प्रॉब्लेम?’

‘नो सर’ आम्ही तिघेही एका सुरात ओरडलो.

परेराच्या त्या पत्रात फक्त चार ओळी होत्या. त्या अशा,

‘स्पेन मधील शेतकरी आपले ट्रेलर प्रामुख्याने डुकरांची ने-आण करण्यासाठी वापरतात. त्यांनी प्रवासात केलेल्या घाणीचा शेतात निचरा करण्यासाठीतळाशी नव्वद मिलिमीटरचे होल देण्यात आले आहे. कृपया ते वाढवून शंभर मिलिमीटरचे करावे’.

-----------

# आयटी क्षेत्रात प्रवेश

कंपनीत सर्व व्यवहारा साठी ओरायन नावाची सिस्टम वापरात होती. जसा कंपनीचा व्याप वाढू लागला तशी ओरायनची क्षमता कमी पडू लागली म्हणून कंपनी ने फ्यूचर लाईन या नावाची सिस्टिम वापरायचे ठरविले. (आयटी कंपनी चे पण तेच नांव होते). त्यांचे प्रतिनिधि प्राथमिक माहिती घेऊन गेले. सिस्टिम प्रत्यक्ष लागू करण्यासाठी दूसरी टीम आल्यावर समन्वयक म्हणून आगम तर्फे मला काम बघण्यास सांगीतले. प्रत्येक विभागातून

एकजण नियुक्त करण्यात आला होता.

उत्पादन, नियोजन, आरेखन, खरेदी, अर्थ, मनुष्यबळ विकास यासारख्या महत्वपूर्ण विभागात प्राधान्याने काम सुरू झाले. कंपनीच्या दैनंदिन व्यवहारात यांचे किती महत्व आहे आणि यांच्या कामाची व्याप्ती किती अफाट आहे हे मला समन्वयक म्हणून काम करतांना लक्षात येऊ लागले.

हे काम करीत असतांना फ्यूचर लाईनचे प्रोजेक्ट हेड, श्रीधर यांच्या संपर्कात मी आलो. ही पण एक विलक्षण कामाचा झपाटा असलेली व्यक्ति होती. सीमाच्या भाषेत अजून एक वर्कोहोलिक. कोणतीही समस्या शांत डोक्याने कशी सोडवावी, विरोधकापेक्षा विरोधाचे सूर कसे दूर करावे हे त्यांनी सोदाहरण शिकवले. प्रत्येक विभाग वेगळा, त्यांच्या अडचणी वेगळया. सर्वांचे नुसते ऐकत जरी बसलो तरी वेड लागेल पण हा माणूस एकदम निवांत. न राहवून एकदा मी

तसे विचारले पण. त्यावर अडचणी आहेत म्हणूनच आपण आहोत नाहीतर आपली काय गरज असे उत्तर मिळाले.

त्यांच्या बरोबर काम करतांना माझी काँप्युटर मधील रुचि वाढली. प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण या त्यांनी सुरू केलेल्या उपक्रमात मी पहिला उमेदवार होतो. प्रशिक्षणा दरम्यान एकदा त्यांनी मला फ्यूचर लाईनमधे काम करशील काय हे पण विचारले. मला आयटीतले काही विषेश येत नाही हे मी त्यांना सांगताच त्यांनी काही कोर्सेस पण सुचविले ते पण मी उत्साहाने पूर्ण केले. मेक्यानिकल किंवा ईतर शाखातील प्रोग्रामिंग करु शकणारे इंजीनियर त्यांना पाहिजे होते. त्यांनी माझा रिझ्यूम पण घेतला.

हे काम सुरू असतांनाच मी एक दिवस सहज मेन्टेनंस विभागात गेलो. माझी सुरवात या विभागापासून झाल्यामुळे मला या विभागा विषयी जरा जास्तच आपुलकी होती, तेथील मंडळी पण लोभ ठेऊन होती. गेल्यावर थोडेफार हाय हँलो झाल्यावर माझ्या लक्षात आले की गगन नावाचा पर्यवेक्षक ब्रेक डाऊन मेमो लिहीण्यात मग्न आहे. मी किंचित आश्चर्यानी त्याला विचारले की तू ही माहिती डायरेक्ट आँनलाइन का भरत नाही. त्यावर तो गमतीने म्हणाला की मेन्टेनंस म्हणजे तळागाळातला समाज. सर्वात शेवटी आमचा नंबर. मी हसतच श्रीधरांना फोन करून याबद्दल विचारले. बजेट नसल्याने सध्या मेन्टेनंसचे काम नंतर करायचे ठरले आहे अशी माहिती त्यांनी दिली. इतका महत्वपूर्ण विभाग आपण कसा काय नंतर कव्हर करणार हे विचारल्यावर त्यांनी प्रांजळ पणे कबुल केले की ते धोरणाच्या विरोधात काम करू शकत नाही. शक्य असल्यास कुठून ही मी चार पीसी आणावे, ते आँनलाइन करायची जबाबदारी त्यांची हे पण त्यांनी सांगीतले.

एव्हाना हे संभाषण सार्वजनिक झाले होते. मी फोन खाली ठेवल्या बरोबर गगन हसला. झाले समाधान असे त्याने विचारले.

‘‘पूर्ण नाही”. मी उत्तर दिले. मला एक कल्पना सुचली.

” चला माझ्याबरोबर” मी म्हणालो.

“कुठे”त्यानी विचारले.

“चार पीसी आणायला”

तो लगेच तयार झाला.

“गाडी कोणती घेऊ?”.

“सध्या फक्त चल. नंतर आण”.

आम्ही दोघेही कॉंप्यूटर ऑफिसकडे गेलो. माझ्या माहितीनुसार टेस्टिंग आणि ट्रायल करिता आणलेले बरेच पीसी एका खोलीत ठेवले होते. त्यातले काही दुरुस्ती होणे अशक्य अशी चिठ्ठी लावून ठेवले होते. तो ढिग बघून माझ्या गगनचा चेहरा पडला.

“हे असले भंगार आम्ही घ्यायचे काय?”त्यानी विचारले.

“नाही, यातून जुगाड़ करून चार पीसी तयार करायचे”मी म्हणालो.

ही भाषा खास मेन्टेनंसची असल्यामुळे त्याला पटकन कळली. तो थोडा विचारात पडल्याचे बघून मी मुद्दाम विचारले” काय, जमणार नाही काय”

“न जमायला काय झाले. मी नंतरच्या पंचनाम्या बाबत विचार करत होतो”. ईति गगन.

“नंतर ते ऑनलाइन करायची जबाबदारी माझी. पण तोपर्यंत मी तुला भेटलो नाही आणि तू मला ओळखत नाही. कळले?”

“ओके, कोण तूम्ही?”गगन

आम्ही दोघेही हसतच आपापल्या कामाला लागलो.

गगन ने त्याचे काम चोख केले. बरोबर चार दिवसांनी त्याने मला हात धरून त्याच्या विभागात नेले. तेथे चार पीसी आणि प्रिंटर मांडून ठेवले होते. “तीस तास रनिंग झाले आहे. एकदाही बंद पडले नाहीत. तूम्ही एक्सपर्ट कडून चाचणी करू शकता” गगनने माहिती पुरविली. गगन आणि त्याचे सहकारी ज्या आत्मविश्वासाने बोलत होते त्यातच सर्व काही आले होते.

“सतीश, आता पुढचे काम तूझे” गगन म्हणाला.

“ठीक आहे. प्रथम आपण हे सर्टिफाईड करून घेऊ नंतर लिंक करू”.

मीरितसर चाचणी करिता परत श्रीधरशी संपर्क केला. त्यांनी पण प्रतिसाद देत मेन्टेनंसचे काम ऑनलाइन सुरू केले. मेन्टेनंसचा पहिला प्रशिक्षक अर्थात गगन होता. हे सर्व काम कसे झाले हे आम्हां तिघा शिवाय कोणालाही कळणार नाही असे मला वाटले होते आणि तिघेही कोणा जवळ बोलणार नाही याची खात्री होती. पण जेंव्हा दसरा पूजेच्या वेळी पीएच मेन्टेनंस विभागांत आले तेंव्हा गगनला उद्देशून म्हणाले की गगन, तू जुगाड़मोठे छान करतो बाबा तेंव्हा मला कळाले की शॉंप मधे कोणतीही गोष्ट गुप्त नसते.

----------

# ईंटरव्हूय्

सीमा आईला भेटायला म्हणून बरेचदा घरी यायची. समवयस्क असल्याने आमचे पण सूर जुळले. मला सीमा आवडत होती हें नाकारण्यात अर्थ नाही पण माझे पाय जमीनीवर होते. सिनेमातल्या गोष्टी प्रत्यक्षात होत नाही एवढे मला कळत होते. तरीपण धीर धरून मी एकदा सीमाला सरळ विचारले. हिटलरला कोण सांगणार यावर आमची चर्चा थांबली. शेवटी तीचे एवढे रेसीडेंट चे वर्ष पूर्ण होऊ दे नंतर बघू असे ठरले.

अशातच एक दिवस श्रीधरांचा फोन आला. त्यांनी सांगीतले की वीकेंड ला पुण्याला होटेल शालिमारमधे माझा ईंटरव्हूय् आहे.

‘मी कधी अर्ज केला’.

‘तूझा रेझ्यूम माझ्याजवळ आहे’.

‘सर, एवढ्यात तरी माझा आगम सोडण्याचा विचार नाही’.

‘नसू दे. आयटी मधे असे ईंटरव्हूय् घेऊन बेंच फोर्स तयार करायची रीत आहे. तू ईंटरव्हूयू तर दे. मी मेल पाठवतो’. असे म्हणून त्यांनी फोन ठेवला.

ईंटरव्हूयूला माझ्याशिवाय अजून दहाजण होते. साध्या कपड्यातला आणि टाय न घातलेला असा मी एकमेव होतो. कुठून कुठून येतात एक एक असा चेहरा करत रिसेप्शनिस्टने एक फॉर्म माझ्या हातात दिला. मी तो लगेच भरून दिला.

पाच उमेदवारांनंतर मला बोलावण्यात आले.

मी आत प्रवेश करताच श्रीधर (जे ईंटरव्हूयू सदस्य होते ) पटकन ऊभे राहिले व ईतरांना उद्देशून म्हणाले की या उमेदवाराला मी चांगला ओळखतो त्यामुळे याच्या ईंटरव्हूयू दरम्यान मी उपस्थित असणे योग्य होणार नाही. असे म्हणून ईतर सदस्य काही बोलायच्या आत ते बाहेर गेले.

ते गेल्यावर एका सदस्यानी मला बसायची खूण केली. परिचयानंतर मी रीझ्यूमची फाईल त्यांच्या समोर ठेवली. सर्व सदस्यांनी ती नीट बघितली आणि रितसर ईंटरव्हूय् सुरू झाला. प्राथमिक प्रश्न विचारून झाल्यावर टेक्निकल प्रश्न विचारले ज्यांची उत्तरे माझ्या मते मी नव्वद टक्के बरोबर दिली. जे माहिती नव्हते ते मी सरळ माहिती नाही म्हणून सांगीतले.

शेवटी त्यांच्यातले एक सदस्य, कपूर यांनी एक प्रिंटेड पेपर मला वाचता येणार नाही अशा बेतानी धरला आणि म्हणाले ' सतीश, तूझा रिझ्यूम फारच चांगला आहे. पण तूझा बेस काही आयटी चा नाही त्यामुळे यानंतर होणाऱ्या आयटी टेस्ट मधे तू काही टिकणार नाही. तूझ्या सारखा माणूस आम्हाला गमवायचा नाही म्हणून आम्हा सर्व सदस्यांतर्फे मी तूला हा टेस्टचा पेपर देत आहे. पण त्यासाठी तूला पन्नास हजार रुपये द्यावे लागतील. ते तू नंतर दिले तरी चालतील'

मी ताडकन उभा राहिलो. माझी फाईल उचलत “साँरी सर. मी चुकीच्या जागी आलो. अशा प्रकारे नोकरी मिळाली तरी मला नको” असे म्हणत जाऊ लागलो.

माझे उत्तर ऐकल्यावर कपूरसह सर्व सदस्य खदखदून हसले. कपूर परत हसतच मला बसायची खूण करत म्हणाले की श्रीधर माझ्या ईमानदारीची फार तारीफ करत होते म्हणून त्यांनी हे नाटक केले केले. होते. त्यांनी ईतर सदस्यांना अजून काही प्रश्न आहेत काय असे विचारताच त्यांच्यापैकी एकमेव महिला सदस्य,

(ज्या बहुधा एचआर च्या असाव्यात कारण सहसा एचआरचे लोक शेवटी तोंड उघडतात त्यांनी विचारले की फ्यूचर लाईन मधे मी अशा कोणाला ओळखतो की त्यांच्यामुळे मला निवड व्हायची खात्री वाटते.

मी शांतपणे उत्तर दिले की मॅडम मी एकच काय पण अशा पाच व्यक्तिंना ओळखतो.

मॅडम लगेच पेन सरसावत नावे सांगा म्हणाल्या.

मी थोडे पुढे वाकून प्रत्येक सदस्याची नेमप्लेट वाचू लागलो, नंबर एक कपूर सर नंबर दोन जोशी सर, नंबर तीन पेठे सर, नंबर चार अय्यर सर आणि नंबर पाच मॅडम.... तुमची नेमप्लेट मला जरा वाचता येईल अशी धरता काय?

सगळेजण इतक्या जोरात हसले की बहुधा त्याच आवाजानी रिसेप्शनिस्ट आत आली. तीच्या हातात एक पेपर होता.

'येस निलो ?' कपूर नी विचारले.

'सर, सतीशनी लॉंजींग चार्जेस काहीच लिहीले नाही त्याबद्दल विचारायचे होते'.

'काय रे सतीश, का लिहीले नाही?.

'सर पुण्यात माझे घर आहे. मी घरीच राहिलो म्हणून लिहीले नाही' मी स्पष्टीकरण दिले.

कपूर दोन मिनिटे माझ्याकडे एकटक बघत राहिले. नंतर निलोला म्हणाले' यानी काय लिहीले असेल त्याप्रमाणे दे आणि शहाणी असशील तर त्याला कन्व्हिंस करायच्या फंदात पडू नको. '

बाहेर आल्यावर निलोनी मला श्रीधर बोलवत आहे म्हणून सांगीतले व त्यांची केबिन दाखविली. आत जाताच श्रीधरनी अभिनंदन केले आणि पोस्टींग पुण्यात असून एका महिन्यात जॉईन हो असे सांगीतले.

त्यांच्या तोंडून देवच बोलत होता हे मला तेंव्हा लक्षात आले नाही.

-----------

# चौकशी

ईकडे कंपनीत ठीक चालले होते. ट्रेलर्सची निर्यात अचानक वाढल्याने कंपनीने ते बाहेरून तयार करून घ्यायचे ठरविले. फायनल डिस्पँच फक्त कुट्टी सर करणार आणि पार्टी संबंधित सर्व बाबी मी बघणार, क्वालिटी चेक पार्टीकडे जागेवर होईल अशी कामाची विभागणी झाली.

सुरवातीला सर्व सुरळीत चालू होते. पण सात आठ दिवसात तक्रारी यायला सुरवात झाली. सगळ्यात गंभीर तक्रार पार्टीकडे जाऊन ट्रेलर तपासणाऱ्या क्वालिटी इन्स्पेक्टर गजनी याच्याबद्दल होती. हे महाशय ट्रेलर पास करण्यासाठी पार्टीकडे पैसे मागू लागले. न दिल्यास काही तरी खूसपट काढणे, किंवा स्वतःच तपासणीच्या नावाखाली हातोडी मारून पोचा करणे असे प्रकार करू लागले. मागण्या फार वाढू लागल्यावर पार्टीचा माणूस मला येऊन भेटला आणि गजनी च्या कारवायांचा पाढा वाचला. मी गजनी ला चार वेळा फोन करून बोलावले पण तो काही शेवटपर्यंत आला नाही. नाईलाजाने मी पार्टीला सविस्तर मेल करण्यास सांगीतले. मेल येताच मी पीएच शी बोलेन आणि आवश्यक ती कारवाई ताबडतोब केल्या जाईल हे त्याला ठामपणे सांगीतले.

त्यानंतर मी परत गजनीला फोन केला पण फोन बंद होता. मी शेवटी तो नाद सोडला आणि बाकीची कामे उरकायच्या मागे लागलो. केव्हा सात वाजले ते मला कळाले पण नाही. सात वाजता मी पीसी बंद करण्यापूर्वी सहज ईनबॉँक्स बघितली तर तीस मेल आलेल्या दिसल्या. त्यात ट्रेलर पार्टीची मेल नुकतीच आलेली दिसली. कुतूहलाने मी ती उघडली. मेल वाचताच मी एक जिवंत बॉँब हातात धरला आहे हे मला जाणवले कारण त्यात पार्टीने गजनीला दिलेल्या रकमा

तपशीलवार दिल्या होत्या. मी ती मेल ताबडतोब पीएच ला पुढे पाठवली आणि पुढील कारवाईची विनंती केली.

दुसऱ्या दिवशी जेंव्हा मी सकाळी आठ वाजता कामावर गेलो तेंव्हा माझ्या पीसी वर दोन एक्सपर्ट्स डाटा डाऊनलोडकरीत होते. हे काय चालू आहे आणि कोणाच्या परवानगीने तूम्ही हे करीत आहात असे विचारले असता त्यांनी पीएच च्या केबिन कडे बोट दाखविले. क्षणभर मला काय बोलावे हे सुचले नाही. नंतर मी केबिनकडे जाऊ लागताच सुधीरने बोलावले.

''आत जाऊ नको. महत्वाची मिटिंग चालू आहे'' सुधीर म्हणाला.

''हे काय चालू आहे एवढेच मला विचारायचे आहे''माझ्या पीसी कडे बोट दाखवीत मी म्हणालो.

''त्या संबंधीची मीटिंग आहे''

''म्हणजे?''

'तूला माहिती नाही काय? काल रात्री आठ वाजता सिक्यूरिटी ने गजनी ला ट्रेलर पार्टीकडून लाच घेतांना पकडले'.

'मग?'

'मग काय त्याच्या संपर्कात आलेल्यासर्वांची चौकशी चालू आहे. मला पण दुसरा पीसी वापरायला दिला आहे'.

तेवढ्यात सिक्युरिटीचे शेख बाहेर आले. मला त्यांनी खुणेनेच बोलावले व माझ्या पीसी कडे नेले. 'तू काल किती वाजता पीसी बंद केला'त्यांनी विचारले.

‘सात वाजता’.

‘गजनी कधी भेटला?’

‘एकदा पण नाही. त्याचा फोन पण बंद होता’

त्यांनी त्यांच्या जवळच्या काही नोंदी तपासल्या.

‘ठीक आहे. ही शेवटची मेल मिळता क्षणी तू पीएच ला फॉरवर्ड केली म्हणून छान झाले. नाहीतर तूझे काही खरे नव्हते. ’

‘म्हणजे. माझ्यावर पण पाळत होती?’

बोलावे की नाही असा क्षणभर विचार करून शेख शेवटी म्हणाले’होय. गजनीवर आमचा संशय होताच पण त्याच्या बरोबर अजून कोण आहेत हे शोधण्यासाठी ट्रेलर संबंधित सर्वांवर पाळत होती. पण तू हे व्यक्तिगत समजू नकोस’.

जरी त्यांनी दिलासा दिला तरी हे प्रकरण तसे लवकर संपणार नाही आणि बरीच उलथापालथ होणार असा मला अंदाज आला.

----------

# वादळ

अपेक्षेप्रमाणे गजनी प्रकरणामागे बरेच मोठे रॅकेट होते. काहीजणांना कंपनीने सोडून जाण्यास सांगीतले तर काहींजण बडतर्फ केले. सत्ता केंद्राच्या जवळ काम करित असल्याने मला ही यंत्रणा किती सफाईने वापरतात हे बघायला मिळाले.

नंतर काही दिवसांनी पीएच दोन महिन्या करता विदेशी गेले. त्यांचे जागी राघव काम बघूलागले. तात्पूरते असेल म्हणून कदाचित पण दोघांच्या कार्य पद्धतीत प्रचंड फरक होता. पीएच जागेवर निर्णय द्यायचे तर हे निर्णय द्यायला जागेवर नसायचे. पीएच सर्वांना समानतेनी वागवायचे तर यांच्याकडे आपला तुपला प्रकार फार. हे सर्व कमी होते म्हणून स्वभाव संशयी.

दोन महिने आपले काही खरे नाही ही सुधीरची भविष्यवाणी मी जरी हसण्यावारी नेली तरी तीन चार दिवसात मला प्रचिती यायला लागली. आम्हा दोघांचाही त्यांच्या हिट लिस्टवर फार लवकर नंबर लागला. मला तर बेशिस्त, बेजबाबदार या पदव्या ताबडतोब मिळाल्या. सुधीरने सबुरीने घ्यायला सांगीतले म्हणून मी शांत राहिलो.

काही दिवसांनी सकाळी सात वाजता इंजिन विभागातून फोन आला. फोन आनंद नावाच्या पर्यवेक्षकानी केला होता. कामगारांनी काम थांबवले आहे, येथे यूनियन लिडर आले आहेत. एचआर ला पण कळवले आहे हे त्याने सांगीतले. कारण विचारताच त्याने नाश्ता उशीरा आला म्हणून हे सांगीतले. मला काही हे पटले नाही पण जाऊनच बघू असा विचार करून मी निघालो. रस्त्यातच

एचआरचा नारायण भेटला. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार इंजिन असेंबली, रेक्टिफिकेशन आणि मेन्टेनंस ही तीन विभाग तेथे ओळीने होते. तेथे नाश्ता देतांना एक दिवसाआड क्रम बदलून द्यायचा अशी पद्धत होती. अंतर जास्त असल्याने असेंबलीला उशीरा नाश्ता आला की कामगार नाराज होत असत.

‘मेन्टेनंसची पण अशीच तक्रार असेल?’ मी विचारले.

‘असेल, पण त्यांनी कधी तक्रार केली नाही’.

‘एक नाश्तेवाला जास्त पाठवला तर?’

‘माणसे कमी आहेत’.

‘तीनही विभाग जवळ आणले तर?’.

‘समस्या सुटेल, कामाला पण बरे पडेल’.

‘‘मग का आणत नाही?’’.

‘राघव सर नाही म्हणतात’’.

‘‘का?’.

त्याने आकाशाकडे बोट दाखविले.

“त्यांना आताचा प्रॉब्लेम कळवला आहे?”.

“हो, जपानी डेलिगेशन बरोबर मिटिंगमधे आहे त्यामुळे सतीश ला सांगा असा sms आला आहे”.

एवढ्यात आम्ही शॉप मधे पोचलो होतो. आनंद पटकन समोर आला. त्याच्याबरोबर यूनियन लिडर गोपाल पण होता. गोपाल मोबाईल दाखवत म्हणाला राघव सर आऊट ऑफ रिच आहेत. नारायण बाजू सावरत म्हणाला त्यांनी सतीशला बघायला सांगीतले आहे.

‘‘हे छान आहे. करायचे त्यांनी निस्तरायचे आम्ही’’ गोपाल रागाने म्हणाला.

“गोपाल, त्याची चर्चा नंतर होत राहिल. प्रथम आपण आता काय करायचे ते बघू”.

“अरे हे तीनही विभाग जवळच पाहिजेत म्हणजे कामाच्या दृष्टिने पण सोईचे होईल”.

मी सहेतुकपणे नारायण कडे बघितले.

“जागा?”माझा प्रश्न.

आनंदने जागापण दाखवली जी गोपालला पण योग्य वाटली. काहीतरी होत आहे असे जाणवल्याने कामगार थोडे जवळ आले. मी कंस्ट्रक्शन च्या सिद्धण्णा ला फोन करून बोलावले. तो आल्याबरोबर त्याला जागा दाखविली व शिफ्टिंग ला किती वेळ लागेल. विचारले.

“एक दिवस, अनायसे उद्या साप्ताहिक सुट्टी आहे. करता येईल. मला फक्त एक सविस्तर मेल पाहिजे”.

“मी दिली तर चालेल?”

“चालेल, राघव सरांपण लूपमधे ठेव”.

आतापर्यंत उत्सुकतेने संभाषण ऐकण्याऱ्या गोपालला मी विचारले की अजून काही सुचवायचे आहे काय. त्यावर त्याने प्यायच्या पाण्याची सोय करण्यास सांगीतले. सिद्धण्णाने त्याची तीन दिवसात करतो म्हणून खात्री देताच गोपाल स्वतःहुन सर्वांना म्हणाला चला नाश्ता घेऊ.

तिथल्याच पीसी वर नारायणने सिद्धण्णाला एक सविस्तर मेल पाठविली. लूपमधे राघव सरांना ठेवले. एक प्रिंट काढून आम्हा सर्वांच्या सह्या घेतल्या. राघव सर आल्यावर त्यांची पण सही घ्यायला येतो असे मला सांगीतले. एवढा व्याप करायची काय गरज आहे या माझ्या शंकेवर हसून तूला ते लवकरच कळेल असेम्हणाला. नंतर आम्ही आपापल्या कामाला गेलो.

मी सुधीरला घडलेले सर्व सांगीतले. त्याने पण योग्य निर्णय घेतला असे म्हणुन राघव सर आल्यावर समक्ष भेटण्याचा सल्ला दिला. आम्ही दोघे बरोबरच जेवायला गेलो. जेवणानंतर परत आलो तर नारायण केबिनमधे जातांना दिसला. दहा मिनिटातच सुधीरचा राघव सरांनी बोलावले आहे म्हणून फोन आला.

केबिनमधे प्रवेश करताच वातावरणात प्रचंड तणाव असल्याचे जाणवले.

“सतीश, तू कोणाला विचारून इंजिन असेंबली एरिया रिअरेंज करायला सांगीतले?”

“तुम्हीच नारायणला सांगीतले होते की सतीश बघेल”.

“मला उलट उत्तरे नकोत. मी लाईन सुरू करण्यासाठी तुला पाठविले होते. रिअरेंज करायचे नाही असे मी नारायण ला सांगीतले होते. त्याने तुला सांगीतले नाही?”.

“सांगीतले. पण त्याशिवाय दूसरा ईलाज नव्हता म्हणून मी तसा निर्णय घेतला”.

“बघितले नारायण. हे उघड उघड इनसबार्डिनेशन आहे. मला हा माणूस चोवीस तासाच्या आत कंपनी च्या बाहेर गेलेला दिसला पाहिजे”.

एव्हाना माझा पण पारा चढला होता.

“सॉरी सर. इनसबार्डिनेशनच्या गप्पा मारण्यापूर्वी स्वतः किती बेजबाबदारीने वागत आहात तेही लक्षात घ्या. तुम्ही मला एक sms करून काय करायचे ते सहज सांगू शकला असता. उलट तूम्ही कोणाचाही फोन उचलत नव्हता”.

राघव अजूनच चिडले.

“मी काय करायला पाहिजे हे तू मला शिकवू नको. एक तर चुका करायच्या वरती उर्मटपणा”.

“मी काहीएक चुकीचे केले नाही. काय चुकीचे केले ते सांगा मी रिअरेंजींग थांबवतो नाहीतर तुम्ही तुमचा अधिकार वापरून. थांबवा”.

“नारायण, याचे बडतर्फीचे लेटर ताबडतोब काढा” ते गरजले.

तेवढे तरी कष्ट कशाला करता असे म्हणत मी त्यांच्या टेबलावरील एका कागदावर राजीनामा लिहून त्यांना देत म्हणालो हा घ्या. माझा राजीनामा आणि केबिनच्या बाहेर आलो. सुधीरला सर्व वृतांत सांगीतला आणि जागेवर गेलो.

नंतर मी श्रीधर यांना फोन केला आणि मी जॉंईन होत असल्याचे सांगीतले.

थोड्यावेळाने सुधीर आला. तीन दिवसांनी पीएच येणारच तोवर थांब, पाहिजे तर रजा घे असे तो म्हणाला. पण मी माझा निर्णय. ठाम आहे असे त्याला सांगीतले.

घरी गेल्यावर मी आईला सर्व घडामोडी सांगीतल्या. केले ते बरोबर केले असे तीचे मत पडले. पुण्याला परत जायचे म्हणून तीला आनंद झाला.

--------

# प्रस्थान

तिसरे दिवशी काही पेपर्स वर सह्या करायच्या आहेत एक दोन तासाकरता तरी ये असा सुधीरचा फोन आला म्हणून मी कंपनीतगेलो. मी आल्याचे कळताच बरेच जण भेटायला आले. सर्वांना वाईट वाटत असल्याचे मला जाणवत होते. मी पण त्यांच्या कडून बऱ्याच गोष्टी शिकलो होतो. मला शुभेच्छा देऊन ते आपल्या कामाला गेले. मी सुधीरला भेटलो. त्याने सुरूवाती पासून खूप मदत केली होती. संपर्कात रहा, कधीही मदत लागल्यास सांग असे म्हणत असता त्याचा कंठ दाटून आला.

पीएच च्या केबिनमधे उजेड नव्हता म्हणून मी सहज विचारले ”आज पीएच येणार होते. ना?” कारण कोठेही गेले तरी परतल्यावर कितीही उशीर झाला तरी त्याच दिवशी कंपनीत येण्याची त्यांची सवय मला माहिती. होती.

“घरी आले आहेत. अजून का कंपनीत आले नाही ते कळत नाही. या आधी असे कधीच झाले नाही”

भेटू नंतर असे म्हणत मी त्याचा निरोप घेतला. गाडी पार्किंग मधुन काढत असतांना ए सायबा, ए सायबा असे आवाज ऐकू आले. बघतो तर सदा आणि दोन सहकारी धावत येतांना दिसले. धापा टाकतच त्यांनी सांगीतले की मला भेटायला म्हणून ते ऑफिसला गेले होते तेथे कळले की मी नुकताच गेलो म्हणून ते ईथवर पळत आले.

यावर काय बोलावे हे न सुचल्याने मी नुसता त्यांच्याकडे बघत बसलो. सदाने हळुच हात पुढे केला आणि एक गुलाबाचे फूल माझ्यासमोर धरले.

“आम्हाला माहिती आहे तू कोणाकडून काही घेतले नाही पण आमच्याकडून एवढे घेच. आम्ही एवढेच देऊ शकतो” सदा म्हणाला.

“सदा, याची तरी काय गरज होती? मी फार लहान माणूस आहे” मी कसाबसा म्हणालो.

“कोणीही असशील पण आम्हाला माणूस म्हणून वागवणारा तू पहिलाच होता”. सदा परत फूल समोर धरत म्हणाला.

मी फूल घेतले आणि वास घेत मनाशीच म्हणालो हीच माझी खरी कमाई.

घरी बेल वाजवताच सीमाने दार उघडले. ती दारातूनच म्हणाली की एवढा मोठा निर्णय घेतांना तीला सांगायची गरज वाटली नाही काय. तोच आई आतून म्हणाली की आधी त्याला घरात तर येऊ दे. मी दार तसेच उघडे ठेऊन आत गेलो आणि घडामोडी फारच वेगाने झाल्यामुळे मी सांगू शकलो नाही हे स्पष्ट केले.

“पण माझे काय?” सीमा ने विचारले.

“आम्ही महिन्यानंतर येऊ तेंव्हा मी तुझ्या बाबाना भेटून तुझा हात माझ्या सतीश करता मागेन” आई म्हणाली.

“ताई, त्याची काही गरज नाही”दारातून आत. येत पीएच म्हणाले” हे दोघे उद्या रजिस्ट्रेशन ऑफिसला जाऊन नोटिस देतील, एक महिन्यानंतर रजिस्टर पद्धति ने लग्न आणि सायंकाळी रिसेप्शन ”.

नंतर हळुच सीमा जवळ जाऊन म्हणाले”काय सीमा, आतातरी खुश?”.

----------

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

"Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow."

– Oliver Wendell Holmes


www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.